धोबी कल्याण अँड अद्योगकि विकास को-ऑप सोसायटी लि.

संचालक मंडळ

(सन २०२१-२०२२ ते सन २०२६-२०२७)

| | |
|---|---|
| १) श्री. संतोष गौरीशंकर कनोजिया | चेअरमन |
| २) श्री. जटाशंकर अमरनाथ रजक | सेक्रेटरी |
| ३) श्री. गंगाराम गंगारामबोडा सट्टा | खजिनदार |
| ४) श्री. मनुलाल सुखलाल कनोजिया | कमिटी मेंबर |
| ५) श्री. लालजी अहीबरन कनोजिया | कमिटी मेंबर |
| ६) श्री. पापन्ना ओसन्ना धोबी | कमिटी मेंबर |
| ७) श्री. असन्ना गंगाराम शेपुर | कमिटी मेंबर |
| ८) श्री. ओमप्रकाश रामधनी कनोजिया | कमिटी मेंबर |
| ९) श्री. गामा छोटेलाल कनोजिया | कमिटी मेंबर |
| १०) श्रीमती. अयलम्मा यादगिरी तडकापेल्ली | कमिटी मेंबर |
| ११) श्रीमती. गौरीबाई बालय्या कोणापील्ली | कमिटी मेंबर |

| | | |
|---|---|---|
| SOCIETY NAME | : | धोबी कल्याण अँड अद्योगकि विकास को-ऑप सोसायटी लि. (Regd.) |
| ADDRESS | : | म्युनसिपल महालक्ष्मी धोबीघाट, डॉ. ई. मोसेज रोड, जेकब सर्कल, मुंबई - ४०० ०११ |
| REGISTRATION NO. | : | BOM / WGS / GNL © / 461 / 94-95 of 1995 Dated 08/11/1994 |
| E-MAIL ADDRESS | : | dhobikalyan.co.op.society@gmail.com |
| WEBSITE | : | www.dhobikalyan.org,com |
| CONTRACT NO. | : | 98216 12740 |
| BANK ACCOUNT | : | State Bank of India, Jacob Circle Branch, Mumbai – 400 011 |
| TYPE OF ACCOUNT | : | Current Account |
| ACCOUNT NO. | : | 30439061869 |
| IFC CODE | : | SBIN0001835 |

“ कृपया ऐतिहासिक स्थळ महालक्ष्मी धोबीघाटला भेट द्या “

मी संतोष गौरीशंकर कनोजिया, धोबी कल्याण आणि औद्योगिक विकास को-ऑप. सोसायटी लिमिटेड या संस्थेचा अध्यक्ष आहे व आमची संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत संस्था आहे आणि त्याची नोंदणी क्रमांक BOM / WGS /GNL (c) / ४६१/९४-९५ of १९९४ दिनांक ०८/११/१९९४ असा आहे व संस्थेचे रजिस्टर ऑफिस म्युनिसिपल महालक्ष्मी धोबीघाट, डॉ. इ. मोसेस रोड,जेकॉब सर्कल,मुंबई - ४०० ०११ येथे आहे. सदर संस्था ही धोबी समाज्यासी निगडित आहे.

धोबी कल्याण आणि औद्योगिक विकास को-ऑप. सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या बद्दल सांगण्या अगोदर मी आपणास धोबीघाट विषयी सांगणार आहे. प्राचीन काळापासून " धोबी " या शब्दाचा अर्थ वॉशर किंवा धुलाई करणारा आणि " घाट " म्हणजे नदीचा किनारा किंवा पाण्याचा किनारा. १९व्या शतकात १८८० मध्ये भारतात ब्रिटिश राजवट होती व दूरदृष्टी लक्षात ठेवून ८० एकर जागेवर ७३१ वॉश स्टोन बांधले आणि कपडे सुकवण्या साठी जागा दिली आणि ही एक ओपन एअर लॉन्ड्रोमेंट म्हणून ओळखली जाते. मुंबईच्या धोबीघाटाची उपयुक्तता व अफाट यश याने प्रेरित होऊन इंग्रजांनी दुसरा धोबीघाट १९०२ साली कलकत्ता येथे बांधण्यात आला.

मुंबईतला हा धोबीघाट पश्चिम रेल्वेच्या सात रस्ता चौकात महालक्ष्मी रेल्वे स्टेशन लगत आहे आणि रेल्वेमधून तसेच महालक्ष्मी स्थानकाच्या उड्डाणपुलावरून हा ओपन एअर धोबीघाट लोकांना आकर्षित करतो. सकाळ पासून ते सूर्यास्त होई पर्यंत रंगीबेरंगी सुकत असलेले कपडे मनाला आनंद देतात व हे एक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्द आहे. भारतीय आणि विदेशी पर्यटक मंबईतील या भागाला भेट देतात आणि जवळच वरळी येथील १९७७ मध्ये बांधलेले नेहरू केंद्र जे विज्ञान व तंत्रज्ञान साठीचे संग्रालय आहे त्याच बरोबर मुस्लिम धर्माचे हाजी अली दर्गा जो समुद्रामध्ये आहे तोही सर्व समाजातील लोकांना आकर्षित करतो व लोक आवडीने हाजी अली दर्गा बघालयास जातात तसेच धोबीघाटापासून १० ते १५ मिनिट अंतरावर म्हणजे भायखळा येथे प्रसिद्द जिजामाता उद्यान आहे तेथे प्राणी संग्रालय आहे तेथे हिंस्र व पाळीव प्राणी बघायला मिळतात त्याचप्रमाणे विदेशी रंगबेरंगी पक्षी सुद्धा आहेत ते लहानांपासून मोठया लोकांनाही लोकांना बघायला आवडते.

सन २०११ मध्ये ४९६ लोक एकाच ठिकाणी हाताने कपडे धुतात अंतर्गत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद मिळवली तसेच सन २०१३ मध्ये जगातील सर्वात मोठी आउटडोअर लॉन्ड्री म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली. धोबीघाट हा परिसर फोटो शूट साठी प्रसिद्ध आहे. कॉलेज मधील विद्यार्थांना प्रोजेक्ट दिला जातो याकरिता देशाच्या कानाकोपरापासून विधार्थी येथे येतात. धोबीघाट हा फिल्म शुटिंग साठीही प्रसिद्ध आहे याठिकाणी शूटआऊट at वडाळा, अमीर खान प्रोडक्शनचा धोबीघाट यासह अनेक हिंदी आणि मराठी चित्रपटासाठी याचा वापर करण्यात आला.

धोबीघाट हा दोन विभागात वाटला गेला आहे एक मोठा धोबीघाट येथे ६३१ वॉश स्टोन आहे व लहान धोबीघाट येथे १०० वॉश स्टोन आहेत आणि धोबीघाटाचे नियोजन बृहन्मुंबई महानगरपालिका बघते त्यात प्रत्येक वॉश स्टोनचे भाडे वसूल केले जातात, वॉश स्टोन हस्तांतर करणे, धोबी घाटाची दुरुस्ती व देखभाल करणे आणि पाणी पुरवठा केला जातो. आज रोजी २०००-३००० लोक या व्यवसायात काम करतात आणि दिवसातले १४ ते १६ तास कपडे धुणे व सुकवणेचे काम करतात.

जसजसे विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती होत आहे तसतशे धोबी व्यवसायात सुद्धा बदल होताना दिसत आहे. बऱ्याच धोबी लोकांनी हाताने कपडे धुणे बंद केले याचे हे ही कारण आहे की बृहन्मुंबई महानगरपालिका कडून पाणी पुरवठा कमी झाला आहे व वेळेतही बदल करण्यात आला त्यामुळे कमी

वेळात जास्त काम काढायचे असते आणि त्याजागी उपाय मानून वॉशिंग मशीन आणि ड्रायिंग मशीन चा वापर होताना दिसतो.

धोबी कल्याण आणि औद्योगिक विकास को-ऑप. सोसायटी लिमिटेड या संस्थेचे संस्थापक श्री. उमा शंकर मिश्रा होते आणि बॉम्बे प्रांत धोबी महामंडल याचे ते अध्यक्ष होते त्यामुळे महालक्ष्मी धोबीघाट त्यांनी सोसायटी १९९४ मध्ये रजिस्टर केली परंतु खऱ्या अर्थाने १९९९ साली संस्थेचे कामकाज सुरु झाले. श्रीयुत उमा शंकर मिश्रा हे एक समाजसेवक होते आणि ते स्वतः धोबी नसले तरी त्यांना धोबी समाजावर प्रेम होते व धोबी लोकांच्या समस्या त्यांनी बघितल्या मुळे सर्व ६६४ वॉश स्टोन धारकांना सोसायटी चे सभासद करून घेतले यासाठी त्यांना तब्बल चार वर्ष मेहनत करावी लागली व सोसायटी चे महत्व पटवून द्यावे लागले आणि याचेच फलित म्हणून २६/०३/१९९९ रोजी पहिली महत्वाची मीटिंग बृहन्मुंबई महानगर पालिकेचे मा. डेप्युटी म्युनिसिपल कमिश्नर व संबांधित विभागाचे प्रमुख असे सात जण हजर होते तसेच श्री. उमा शंकर मिश्रा यांचे बरोबर धोबीघाटातील सात प्रतिनिधी हजर होते आणि याच मिटिंग मध्ये वॉश स्टोन चा दर प्रति माह रुपये १५०/- फिक्स करण्यात आला व प्रति वर्षी १० टक्के वाढ ठरविण्यात आली तसेच कपडे सुखविण्याचा जागेवर अनधिकृत झोपड्या आहेत त्या खाली करून अनधिकृत झोपड्या धारकांचे स्थलांतर करून योग्य कंपाऊंड भिंत बांधून ती जागा सोसायटीला हस्तांतर करण्याचा प्रस्ताव देण्यात आला, धोबी घाटातील भट्टी परिसर दुरुस्ती करणे, सौचालय दुरुस्ती, फूटपाथ व रोड वरील अतिक्रमण हटवणे, चोर व गुंडांपासून धोबी लोकांना स्वरंक्षण देणे अशा बऱ्याच विषयांवर चर्चा झाली आणि व बरेच विषयही मार्गी लागले आणि तेव्हा पासूनच महालक्ष्मी धोबीघाट मधील बृहन्मुंबई महानगर पालिके संबांधित विषय धोबी कल्याण आणि औद्योगिक विकास को-ऑप. सोसायटी लिमिटेड मार्फत मांडले जातात.

ज्या वेळेला चांगले काम होत असते तेव्हा त्याला नजर लागते हा निसर्गाचा नियमच आले तेही दिवस आमच्या कमिटीने व सोसायटीने बघितला आहे. महालक्ष्मी धोबीघाट हा मुंबई येथील प्रख्यात जागी असल्याने बऱ्याच बिल्डर लॉबी या वर लक्ष ठेवून होती त्यातच धोबी लोकांच्या कपडे सुखविण्याचा जागेवर अनधिकृत झोपड्या वाढत गेल्या म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत या जागेवर रहिवासी टॉवर बांधण्याचा प्रस्ताव आला त्याकरिता धोबी लोकांची कपडे सुकविण्याची जागा विकणे, झोपड्या बद्दल टॉवर मध्ये घर व दुकानासाठी कमर्शिअल गाला असा प्रस्ताव दिला गेला परंतु धोबी लोकांची कपडे सुकविण्याची जागा बाबत कोणतेही ठोस मोजमाप नव्हते याकरिता सोसायटी मार्फत तयार केलेले रस्सी धारक प्रमाणपत्र ग्राह धरण्यात आले व त्यानुसार दर ठरवण्यात आला परंतु काही असंतुष्ट वर्गांनी धोबी लोकांना कमी जास्त भावात जागा विकण्यास लावले व त्यातून कमिशन मिळवले याबाबत सोसायटीने जाब विचारला तर सोसायटी वर खोट्या केसस टाकण्यात आल्या पर्यायी सोसायटी वर पाच वर्ष कालावधी साठी प्रशासक नेमणूक करण्यात आली.

आता डिसेंबर २०२१ मध्ये सोसायटीची रीतसर निवडणूक झाली व परत मला अध्यक्ष म्हणून मान्यता मिळाली तरी मागील पाच वर्षाच्या कालावधीत सोसायटीच्या बऱ्याच सभासदाचे निधन झाले, काहींनी त्यांचे वॉश स्टोन दुसऱ्या नावे हस्तांतर केले आहे या सर्व धोबी लोकांना परत एकत्र आणणे हा फार मोठे अवघड काम सोसाटीला करावे लागणार आहे. मागील काळात सोसायटी कार्यरत नसल्याने समाजकंटक, असंतुष्ट वर्ग, दलाल लॉबी सक्रिय झालेले होते त्याच्यावर नियंत्रण आणण्याचे काम हाती घेतले आहे व त्यात यशही मिळत आहे.